॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572

**Centre for Distance Education**

website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215144

E-mail: decsrtmun@gmail.com

जा.क्र :स्वारातीमविनां/दू.वि/२०२१–२२/३७१ दि. ३०/०९/२०२१

प्रति,

मा. प्राचार्य/केंद्र समन्वयक

कै. बापूसाहेब पाटील एकंबेकर

महाविद्यालय, उदगीर जि. लातूर

**विषय :– शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये पदव्युत्तर स्तरावर एम.ए. व एम.कॉम. प्रथम बहिस्थ अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करणे बाबत..**

महोदय,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागातर्फे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील मान्यता प्राप्त अनुदानीत/विनाअनुदानीत अभ्यासकेंद्रांना /महाविद्यालयांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१–२०२२ साठी बहिस्थ शिक्षण प्रणालीवर आधारीत प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली असून पदव्युत्तर एम.ए. प्रथम वर्ष मराठी, हिन्दी, इंग्रजी, उर्दु, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, लोकप्रशासन, व इतिहास या नऊ विषयासाठी तसेच एम.कॉम. प्रथम वर्ष वार्षिक परीक्षा पध्दतीने प्रवेश प्रक्रिया दि. ०१/१०/२०२१ पासुन सुरू झाली आहे. संबंधीत विषयात प्रवेश घेण्याची अंतीम तारीख ०१/१०/२०२१ ते दि. १५/११/२०२१ पर्यंत प्रवेश देण्यात यावेत.

**सदर बहिस्थ शिक्षण प्रणालीत बदल करण्यात आला असून यामध्ये पदव्युत्तर स्तरावर एकुण १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल व सदर परीक्षेत पास होण्यासाठी विद्यार्थ्यांना किमान ४० गुण मिळविणे अनिवार्य आहे. सदर शिक्षण प्रणालीमध्ये अंतर्गत परीक्षा घेतली जाणार नाही व २५ टक्के एटीकेटीचा नियम लागू राहील हे आपणास विदितच आहे. परंतु अभ्यासकेंद्रावर नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारची सूचना देण्यात यावी म्हणूनच हे मुद्दाम कळविण्यात येत आहे याची नोंद घ्यावी.**

सदरील पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमासाठी प्रवेश, पात्रता, परीक्षा शुल्क आदी बाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (**Distance Education** या लिंकवर) उपलब्ध आहे.

प्रवेश, पात्रता, परीक्षा शुल्क व स्वयंअध्ययन साहित्य शुल्क यांचे स्वतंत्र धनादेश (डि.डी.) किंवा (**NEFT**) करण्यासाठी मा. वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा खाते क्रमांक (**A/CNo.500104000028422) IFSC Code;-IBKL0000500**) यांचे नावे काढून दि. २३/११/२०२१ पर्यंत दूरशिक्षण विभागात जमा करण्यात यावेत उशिरा प्राप्त झालेले आवेदनपत्र व शुल्क स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी ही विनंती.

( डॉ. रमाजाने मुलानी )

संचालक

दूरशिक्षण विभाग प्रस्तुत विद्यापीठ,